THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 2ND FEBRUARY 1893.

Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

## PART IX.—Marathi Acts, &c

### रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम मुंबई, तारीख ४ माहे जानेवारी सन १८९३.

नंबर १९.—हिंदुस्तान सरकारचा खालीं दिलेला जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला आहेः—

### "होम डिपार्टमेंट.

पब्लिक.

मुक्काम कलकत्ता, तारीख ३० माहे डिसेंबर सन १८९३.

नंबर २३६९.—सन १८८४ चा हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट याच्या ९ व्या कलमावरून दिलेले अधिकार चालवून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे असें फर्मावितात कीं होम डिपार्टमेंटचा जाहिरनामा नंबर १४१७,* तारीख २४ जून सन १८८७, यांत प्रसिद्ध करण्यांत आलेल्या, बारी पदार्थ इकडून तिकडे पाठविण्याचें व ते बाहेरून आणण्याचें नियमन करण्याबाबदच्या कानूंपैकीं ४ (३) ह्या कानूच्या ऐवजीं आणि ६ (१६) ह्या कानूच्या तिसऱ्या वाक्याच्या ऐवजीं खालीं दिलेली कानू व वाक्य हीं दाखल करावीं :—

*तारीख ३० जून सन १८८७ चे मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १ ला, पान्या ५११—५१८ ह्या पृष्ठांवर पुनः प्रसिद्ध केलेला.

४ ( ३ ).—सार्वजनिक रेलवेनें न्यावयाचीं बारी पदार्थांचीं लहान कन्सैन्मेंटें खेरीज करून इतर कन्सैन्मेंटें सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरमियानच्या वेळेंत मात्र भरावीं अगर उतरावीं: लहान कन्सैन्मेंटें कोणत्याहि वेळेस उतरण्यास हरकत नाहीं. अर्ध्या वागणीहून ज्यास्त कन्सैन्मेंट कोणत्याहि एकाच स्टेशनास पाठविल्यास तें ह्या कानूच्या कारणांसाठीं लहान कन्सैन्मेंट समजूं नये.

६ (१६).—तिसरें वाक्य.—कानू ४(३) यांतील ठरावांस अनुसरून बारी पदार्थ भरण्याचें व उतरण्याचें काम एकदा सुरू केल्यावर तें सगळें संपे तोंपर्यंत दक्षतेनें चालविलें पाहिजे.

(सही) सी. जे. लायल,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार."

आलीजा बाहादुर गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) टी. डी. म्याकंझी,
चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation.)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम मंजिरे मुंबई, तारीख २८ डिसेंबर सन १८९२.

नंबर १०१३७.—हिंदुस्तान सरकारचा खालीं दिलेला जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असे :—

## "होम डिपार्टमेंट.

### पब्लिक.

मुक्काम कलकत्ता, तारीख २२ माहे डिसेंबर सन १८९२.

नंबर २३४०.—हिंदुस्तानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४था) याच्या १८व्या कलमाच्या (१) त्या पोट-कलमांतील ठरावांस, आणि होम डिपार्टमेंटचा जाहिरनामा नंबर १९६४ * तारीख २ सेप्टेंबर सन १८८७, यांतील हुकुमांस अनुसरून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, होम डिपार्टमेंटचा जाहिरनामा नंबर १९८९ † तारीख २९ जूलै सन १८८८ यांत प्रसिद्ध करण्यांत आलेल्या, बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याच्या लैसेन्सांबाबद घ्यावयाच्या फीसंबंधी, कानूच्या ऐवजीं दाखल करण्यासाठीं त्यांनीं योजलेल्या कानूचा मसुदा सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं खालीं प्रसिद्ध केला आहे:—

* तारीख ८ सेप्टेंबर सन १८८७ चें मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १, याच्या ७८४व्या पृष्ठावर पुनः प्रसिद्ध केलेला.

† तारीख २ आगष्ट सन १८८८ चें मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १, याच्या ६४९व्या पृष्ठावर पुनः प्रसिद्ध केलेला.

ह्या मसुद्याचा विचार ह्या जाहिरनाम्याच्या तारखेनंतर दोन महिन्यांनीं करण्यांत येईल.

### कानूचा मसुदा.

बंदुकीची दारू, फूजी किंवा इतर बारी पदार्थ हीं कबज्यांत ठेवण्यासाठीं कंन्ट्राक्टरांना लैसेन्स द्यावयाचे असतील त्या प्रसंगीं सुरुंग लावण्याच्या कारणासाठीं, आणि शेतकऱ्यांना किंवा इतर मनुष्यांना लैसेन्स द्यावयाचे असतील त्या प्रसंगीं शेतकीसंबंधी कामांच्या किंवा सार्वजनिक उपयोगाच्या कामांच्या संबंधानें सुरुंग लावण्याच्या कारणासाठीं, त्यांची खरोखर जरूरी आहे असें लैसेन्स देणाऱ्या अमलदाराच्या खात्रीपूर्वक शाबित केलें असतां तीं वाजवी प्रमाणानें कबज्यांत ठेवण्यासाठीं कन्ट्राक्टरांना, शेतकऱ्यांना किंवा इतर मनुष्यांना लैसेन्स देण्यांत येतील त्यांबदल फी घेऊं नये.

(सही) सी. जे. लायल,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार."

आलीजा बहादुर गव्हर्नर इन् कौन्सिल
यांच्या हुकुमावरून,

(सही) टी. डी. म्याकेन्झी,
चीफ् सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.